Estd. 1962
NAAC "A" Grade
"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

५२ /२०२४

**विषय - दि.०६ जून, २०२४ रोजीची अर्धा दिवसाची कार्यालयीन वेळ भरुन काढणेबाबत..**

सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, अधिकारी, व प्रशासकीय सेवकांना आदेशान्वये कळविण्यात येते की, दि.०६ जून, २०२४ रोजी ३५० वा शिवराज्याभिषेक निमित्त शिवाजी विद्यापीठात विविध कार्यक्रमांचे तसेच, शिवज्योत रॅलीचे आयोजन करुन "शिवस्वराज्य दिन" साजरा करण्यात करण्यात आला होता. या दिवशी कार्यालयीन व पदव्युत्तर विभागाची कामकाजाची वेळ सकाळी ८.०० ते ११.३० वा. अशी निश्चित करुन सकाळी ११.३० वा. नंतर विद्यापीठातील सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व सेवक यांनी कोल्हापूर शहरात शिवस्वराज्य दिनानिमित्त आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमासाठी आर्वजून उपस्थित रहाणेबाबत परिपत्रकानुसार कळविण्यात आलेले होते.

तसेच, सदर परिपत्रकामध्ये दि. ०६ जून, २०२४ रोजीची उर्वरित कार्यालयीन वेळ भरुन काढण्याबाबत यथावकाश कळविले जाईल. असे, दि. ०३ जून २०२४ रोजीच्या परिपत्रकामध्ये नमूद केलेले होते. त्याअनुषंगाने **विद्यापीठातील सर्व प्रशासकीय विभाग व अधिविभागांनी दि.३१ डिसेंबर, २०२४ पर्यंत आपल्या विभागातील कामकाजाची आवश्यकता लक्षात घेवून सुट्टी दिवशी किंवा कार्यालयीन वेळे पूर्वी किंवा कार्यालयीन वेळे नंतर अर्धा दिवस कार्यालयीन काम करुन दि. ०६ जून, २०२४ रोजीची कार्यालयीन वेळ भरुन काढावी.**

सर्वांनी कार्यालयीन वेळ भरुन काढलेली नोंद ही फेस रिकग्नेशन मशीनव्दारे नोंदविणे आवश्यक आहे. तसेच, त्याची मॅन्युअल नोंद विभागात ठेवून त्याचा एकत्रित अहवाल प्रशासकीय विभाग व अधिविभागांनी विभाग प्रमुखांमार्फत दि.०१/०१/२०२५ रोजी आस्थापना विभागास कळविण्यात यावा.

(डॉ. व्ही. एन. शिंदे)
**कुलसचिव**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**जा.क्र. आस्थापना/** ३०६४
**दि.** 13 DEC 2024

**प्रति,**

१) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
२) सर्व संबंधित शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवक.